सकाळ
रविवार, २१ फेब्रुवारी २०२१

## शिवाजी कॉलेजमध्ये प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**सातारा :** छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञान समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'अध्ययन-अध्यापन व्यवस्थापन प्रणाली' या विषयावर प्रशिक्षण शिबिर झाले. त्याचे उद्‍घाटन कुरुकली (जि. कोल्हापूर) येथील भोगावती कॉलेजचे ग्रंथपाल प्रा. पी. एस. कल्लोळी यांच्या हस्ते झाले. छत्रपती शिवाजी कॉलेज अध्ययन-अध्यापन व्यवस्थापन प्रणाली विकसित करीत आहे, हे कौतुकास्पद असल्याचे प्रा. कल्लोळी यांनी सांगितले. प्रा. डॉ. अभिमान निमसे यांनी नवीन अध्यापन पद्धतीची माहिती दिली. प्रा. डॉ. अनिल वावरे, प्रा. डॉ. सुभाष वाघमारे, उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. शिबिर समन्वयक डॉ. सुधाकर कोळी यांनी आभार मानले.

सहाय्यक ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.